# Walk In Interview

## जाहिरात

आ. क्र. 2019 दि. ८.३.२२

श्री.वसंतराव नाईक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय यवतमाळ या संस्थेमध्ये रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता तसेच यवतमाळ जिल्हा हा आदीवासी बहुल जिल्हा आहे. या जिल्यामध्ये बाहेरील राज्यातुन येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक आहे करीता ,

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ या संस्थेमधील रुग्णसेवा ही सुरळीत चालु राहण्याकरीता या संस्थेमध्ये रिक्त असलेल्या पदांमुळे रुग्णसेवेवर विपरीत परीणाम होणार नाही याकरीता तसेच या संस्थेमध्ये मा.संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे मार्फत नियमित उमेदवार/बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंतच्या कालावधीकरीता शासन निर्णयानुसार मंजुर असलेल्या रुग्णालय / स्त्रि रुग्णालय आस्थापनेवर मंजुर असलेले वैद्यकीय अधिकारी वर्ग - २ ची १५ पदे स्थानिक स्तरावर कंत्राटी पध्दतीने वा निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरती Walk In Interview मार्फत करावयाची आहे. त्यासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे आहे. (प्रत्यक्ष मुलाखत दिनांक ०९/०३/२०२२ दु.३.०० वा.)

| अ.क्र | पदनाम | शैक्षणिक अर्हता | पदे |
|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी (कंत्राटी) | एमबीबीएस | १५ |

०१) मानधन -

पदाचे नाव - १) वैद्यकीय अधिकारी वर्ग - २ (कंत्राटी) करीता —— रु.८०,०००/- एकत्रित व ठोक

२ अ) - १ सदर उमेदवाराची नियुक्ती शासन निर्णय क्र.एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३ दि. ३१ डिसेंबर २०२० अन्वये एकत्रित ठोक रु. ८०,०००/- (अक्षरी-अंशी हजार फक्त) या मानधनावर नियुक्ती करण्यात येत आहे. (केवळ वैद्यकीय अधिकारी करीता)

२. महाराष्ट्र लोकसवा आयोग पुरस्कृत उमेदवार/बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा ईतर संस्थेतुन महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार बदलुन रुजु होई पर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत नियुक्ती करण्यात येत आहे.

३.त्यांना महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत आपल्या नावाची नोदनी. करणे आवश्यक आहे किंवा भारतीय वैद्यकीय नोदवहित त्यांचे नाव असने आवश्यक आहे. जर त्यांच्याकडे प्रोविजनल रजिस्ट्रेशन असल्यास त्यांनी एक महिण्याच्या आत परमनंट रजिस्ट्रेशन सादर करणे बंधन कारक राहील. अन्यथा त्यांना वेतन व भत्ते अदा केले जानार नाही.

५ नियुक्ती मिळाल्या नंतर संबधित उमेदवारांना तातडीने केवळ ०५ दिवसांचे कालावधीत कर्तव्यावर रुजु होने आवश्यक आहे. तातडीने रुजु न झाल्यास संबधित आदेश रद्द समजण्यात येईल.

६. सर्वप्रथम श्री.व.ना.शा.वै.महा.मधुन पदवी पुर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारांना प्रथम प्राधान्य राहील. त यानंतर महाराष्ट्रातील इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामधुन पदवी पुर्ण केलेल्या बंधपत्रित उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. नंतर श्री.व.ना.शा.वै.महा.मधुन पदवी पुर्ण केलेल्या अबंधपत्रित उमेदवारांना प्रथम प्राधान्य राहील. सदरील संस्थेमधुन उमेदवार प्राप्त न झाल्यास खासगी महाविद्यालयामधील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल

७ त्यांचा खंडीत सेवा कालावधी नियमित करण्यात येणार नाही व त्यांची खंडीत नियुक्ती नवी नियुक्ती समजण्यात येईल. या बाबत कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

८ त्यांनी शासन सेवा सोडतांना एक महिण्याची पुर्व सुचना देणे आवश्यक आहे. न दिल्यास त्यांना नियमानुसार एक महिण्याच्या वेतना ईतकी रक्कम शासन खाती जमा करावी लागेल. त्यांना नियुक्तीच्या वेळी या कार्यालयात संस्था प्रमुखाच्या नावे हमी पत्र देणे आवश्यक आहे, उमेदवार बंधपत्रित असल्यास बंधपत्रित कालावधीत राजीनामा दिल्यास अथवा बंधपत्रित कालावधी पुर्ण केल्यास त्यांना नियमाप्रमाणे उर्वरित बंधपत्रित कालावधीची/बंधपत्राची रंक्कम शासनास अदा करावी लागेल.

९ या तात्पुरत्या नियुक्ती मुळे त्यांना जाहिरातीत नमुद केलेल्या पदावर कायम निवडीसाठी हंक सागता येणार नाही.

१० त्यांनी कर्तव्यावर रुजु झाल्यावर दोन दिवसाच्या आत कोणत्याही बँकेचे क्रमांक कार्यालयातील लेखा विभागास सादर करावे. त्याशिवाय त्यांचे मानधन जमा होणार नाही.याची नोद घ्यावी.

११ ज्या विभागात आपली नियुक्ती करण्यात आली आहे त्याच विभागात नियमानुसार कार्यकरावे लागेल. तसेच मा.अधिष्ठाता/नि.वै.अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील.

१२. आपली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची / कंत्राटी असल्याने कोणत्याही वेळी कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यात येईल याची नोद घ्यावी.

१३. आपली नियुक्ती वैद्यकीय मंडळाकडील स्वास्थप्रमाणपत्रावर तसेच चारीत्र्य व पुर्वचारीत्र या बाबत पोलीस अधिकाऱ्याकडुन प्राप्त पडताळणी अहवालावर अवलंबुन राहील. त्यांचे स्वास्थ प्रमाणपत्र व पोलीस अहवाल असमाधानकारक असल्याचे आढळुन आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

१४.आपण आपल्या तात्पुरत्या नियुक्तीसंबंधात न्यायालयात कोणत्याही प्रकारचा दावा करणार नाही याबाबतचे **हमीपत्र** सादर करणे बंधनकारक राहील.

१५. सदर पदावर नियीमत/बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध झाल्यास आपली सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल. व त्यावर आपला कोणताही हक्क राहणार नाही.

१८. निवड करण्यात आलेल्या अमेदवारांना कमीत कमी ४ महिण्या पर्यंत सेवा देणे बंधनकारक राहील अथवा आपणास अनुभव प्रमाणपत्र अदा करण्यात येणार नाही.

१९. निवड झालेल्या उमेदवारांचे काम समाधानकारक असल्यास नियमानुसार दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील आदेश निर्गमित करण्याचा अधिकार मा.अधिष्ठाता यांना राहील

२०.संस्थेत सध्या कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे बंधनकारक असेल.

२१.सदर जाहिरात प्रक्रिया कोणत्याही वेळी स्थगित /रद्द /जाहिरातीत बदल करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, श्री.व.ना.शा.वै.म.व रुग्णालय, यवतमाळ /मा.आयुक्त/मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे कडे राखुन ठेवण्यात आलेला आहे.

२२.जाहिरातीसोबत आवेदन पत्राचा नमुना सोबत जोडलेला आहे.

# Certificates Required (Self attested Zerox copy one set)

1) Mark list of MBBS exam 2) MBBS Degree Certificate / Passing Certificate 3) Attempt Certificate of 1st, 2nd, Final MBBS exam 4) MMC Ragistration 5) MBBS + Additional Qualification Registration 6) Internship Completion Certificate 7) Certificate as bonded candidate from appropriate authority Candidates must bring all original documents at the time of interview 7) 10 th bourd certificate

## (( सर्व साधारण अटी))

१) वरील पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होऊ शकतो. २) वरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्य शासनाचा कर्मचारी म्हणता येणार नाही.३) एमएस-सीआयटी परीक्षा पास असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. ४) ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत दिनांक व वेळेत प्राप्त होतील त्याच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. ५) उमेदरावारांना मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. ६) सदर पदावर कंत्राटी स्वरुपात नियुक्त झाल्यास दिवस व रात्रपाळीमध्ये काम करावे लागेल. ७) निवड झालेले उमेदवार निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी (करार ) स्वरुपातील असल्याने ते कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील. त्यावर त्यांना कोणताही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही. ०८) नियुक्ती झाल्यानंतर कोणत्याही क्षणी कोणत्याही सबबीशिवाय कोणत्याही उमेदवाराची सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता यांना राखुन ठेवले आहेत. १०) प्रत्यक्ष मुलाखतीला आवश्यक शैक्षणिक अर्हतेनुसार प्रमाणपत्रे (प्रथम/द्वीतीय/तुतीय वर्षाची गुणपत्रिका, पासिंग सर्टीफिकेट, डीग्री (अत्यावश्यक), इतर आवश्यक कागदपत्रे तसेच अनुभव प्रमाणपत्र व पासपोर्ट साईज फोटो व ओळखपत्र (टिसी/आधार कार्ड/पॅन कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट पैकी कोणतेही दोन) सोबत ठेवावे. (उपरोक्त सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जा सोबत ठेवणे आवश्यक राहील) ११) उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरीता (Walk In Interview) सर्व मुळ प्रमाणपत्रांसह दिनांक ०९/०३/२०२३ रोजी दुपारी ठिक.३.०० वा. स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच मुलाखतीकरीता अनुपस्थित असणाऱ्या उमेदवारांच्या

प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही १२) मुलाखतीच्या वेळेस सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक राहील व मुळ कागदपत्रे सादर न करण्याऱ्या उमेदवाराचा मुलाखतीकरीता विचार केल्या जाणार नाही.

१३) मुलाखतीचे ठिकाण: महाविद्यालय परीषद हॉल, श्री.व.ना. शा. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ

१४) प्रत्यक्ष मुलाखत दिनांक ०९/०३/२०२२ ( ठिक ३.०० वा.) [गुरुवार].

अधिष्ठाता,
श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
यवतमाळ